**Estd 1962**

**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## २६/९/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या असून काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची पुनर्परीक्षा दि. १६ सप्टेंबर २०२१ पासून सुरु झाल्या आहेत. आज दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी **पर्यावरणशास्त्र** या अभ्यासक्रमाची पुनर्रपरीक्षा सुरळीतपणे पार पडल्या.

आजच्या या पुनर्परीक्षेसाठी ३६८ विद्यार्थ्यापैकी २३७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

तसेच अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.